# MAHARASHTRA ACT No. XXVI OF 1963.

## AN ACT TO REPEAL CERTAIN ENACTMENTS AND TO AMEND CERTAIN OTHER ENACTMENTS.

## सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

[ राष्ट्रपति यांची संमति मिळाल्यानंतर " महाराष्ट्र राजपत्रांत " दिनांक ४ जून १९६३ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला]

### विवक्षित अधिनियम रद्द करण्याबाबत आणि इतर विवक्षित अधिनियमांत सुधारणा करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, जे अधिनियम अंमलांत असण्याचे बंद झाले आहेत किंवा अनावश्यक किंवा अप्रचलित झाले आहेत असे विवक्षित अधिनियम यांत यापुढें दिलेल्या कारणासाठी रद्द करणें आणि इतर विवक्षित अधिनियम सुधारणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या चौदाव्या वर्षी याद्वारें पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास महाराष्ट्राचा (अधिनियम) रद्द करण्याबाबत व सुधारण्याबाबत अधिनियम, १९६३ असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. संपूर्ण महाराष्ट्र राज्यांत किंवा यथास्थिति त्याच्या कोणत्याहि भागांत लागू केलेले, पहिल्या अनुसूचींत निर्दिष्ट केलेले अधिनियम, त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात उल्लेख केलेल्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीने याद्वारें रद्द करण्यांत येत आहेत. विवक्षित अधिनियम रद्द करणे.

३. यास जोडलेल्या दुसऱ्या अनुसूचीत निर्दिष्ट केलेले अधिनियम, त्या अनुसूचीच्या चौथ्या स्तंभात उल्लेख केलेल्या मर्यादेपर्यंत व त्या रीतीनें, याद्वारे सुधारण्यांत येत आहेत. विवक्षित अधिनियमाची सुधारणा.

४. (१) या अधिनियमान्वये कोणताहि अधिनियम रद्द करण्यांत आला असला तरीहि, त्यामुळें रद्द केलेला अधिनियम ज्या कोणत्याहि इतर अधिनियमास लागू करण्यात आला असेल, त्यांत समाविष्ट करण्यांत आला असेल किंवा त्याचा उल्लेख करण्यांत आला असेल त्यावर परिणाम होणार नाही ; बचाव व अर्थ लावणे.

आणि या अधिनियमामुळे, अगोदरच केलेली किंवा करूं दिलेली कोणतीहि गोष्ट किंवा अगोदरच संपादन केलेला कोणताहि हक्क किंवा मालकी हक्क, प्राप्त झालेले कोणतेहि बंधन किंवा पत्करलेली जबाबदारी, किंवा त्यासंबंधांतील कोणतीहि उपाययोजना किंवा कामकाज, किंवा कोणतेहि कर्ज, शिक्षा, बंधन, जबाबदारी, दावा किंवा मागणी यांत दिलेली सूट किंवा केलेली मुक्तता किंवा अगोदरच दिलली कोणतीहि हमी किंवा पूर्वीच्या कोणत्याहि कृत्याचा किंवा गोष्टीचा पुरावा याची वैधता, अवैधता, किंवा परिणाम यास बाध येणार नाही.

तसेंच, या अधिनियमामुळें विधीचे कोणतेंहि तत्त्व किंवा नियम किंवा प्रस्थापित क्षेत्राधिकार वाद, प्रतिवादाचे स्वरूप किंवा त्याचा क्रम, प्रथा किंवा कार्यरीति किंवा प्रचलित रिवाज, रूढि, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, पद किंवा नेमणूक या गोष्टीस बाध येणार नाही, मग त्या गोष्टी अनुक्रमें याद्वारें रद्द केलेल्या कोणत्याहि अधिनियमान्वये संमत केलेल्या असल्या किंवा त्यास अशा अधिनियमांत मान्यता मिळालेली असली किंवा त्या अशा अधिनियमांतून निष्पन्न झालेल्या असल्या तरीहि हरकत नाही.

तसेंच, या अधिनियमान्वयें कोणताहि अधिनियम रद्द केल्यामुळे, सध्यां अस्तित्वात किंवा अंमलात नसलेला कोणताहि क्षेत्राधिकार, पद, रूढि, जबाबदारी, हक्क, मालकी हक्क, विशेषाधिकार, निर्बंध, माफी, रिवाज, प्रथा, कार्यरीति किंवा इतर बाब, किंवा गोष्ट पुन्हा अस्तित्वात किंवा अंमलात येणार नाहीं.

## पहिली अनुसूचि.

### रद्द केलेले अधिनियम.

(कलम २ पहा.)

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | जेथवर रद्द करण्यांत आला ती मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | **१. केन्द्रीय अधिनियम.** | |
| १८७२ | ९ | महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ क्षेत्रास लागू केलेला भारतीय करार अधिनियम, १८७२. | मध्यप्रांत व वऱ्हाडचा भारतीय करार (सुधारणा) अधिनियम, १९३८ (सन १९३८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक १५) या अन्वये दाखल करण्यात आलेली कलमे १९-ब व १९-क. |
| | | **२. मुंबई अधिनियम.** | |
| १८८३ | १ | मुंबई राजपथ अधिनियम, १८८३. | संपूर्ण. |
| १९४४ | ८ | मुंबईचा खाद्यधान्याच्या पिकांची लागवड करण्याबाबत अधिनियम, १९४४. | संपूर्ण. |
| १९४५ | २३ | मुंबईचा शिकाऱ्यांबाबत अधिनियम, १९४५. | जेथवर तो रद्द करण्यात आला नसेल त्या मर्यादेपर्यंत. |
| १९४९ | २७ | मुंबईचा स्वदेशी परत पाठविलेल्या कैद्यांबाबत अधिनियम, १९४९. | संपूर्ण. |
| | | **३. मध्यप्रदेश अधिनियम.** | |
| १९३३ | २ | मध्यप्रांत व वऱ्हाडचा कर्जाच्या समेटाबाबत अधिनियम, १९३३. | संपूर्ण. |
| १९३८ | १५ | मध्यप्रांत व वऱ्हाडचा भारतीय करार (सुधारणा) अधिनियम, १९३८. | संपूर्ण. |
| १९४७ | २८ | मध्यप्रांत व वऱ्हाडचा आक्षेपार्ह जाहिरातीस प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९४७. | संपूर्ण. |
| १९४८ | ६४ | मध्यप्रांत व वऱ्हाडचा बियांच्या उत्पादनाचे (शेतीच्या कारणासाठी) नियमन करण्याबाबत अधिनियम, १९४८. | संपूर्ण. |
| १९५४ | २२ | मध्यप्रदेश विस्थापित जमीन धारकांच्या (भूमि संपादन) पुनर्वसनाबाबत अधिनियम, १९५४. | संपूर्ण. |
| | | **४. हैदराबाद अधिनियम.** | |
| १३२९-फ | १६ | हैदराबादचा नपुंसक इसमांबाबत अधिनियम. | संपूर्ण. |
| १९५१ | २१ | हैदराबादचा कर देण्याबाबत (मालमत्ता हस्तांतरण) अधिनियम, १९५१. | संपूर्ण. |

## दुसरी अनुसूचि.

### सुधारलेले अधिनियम.

(कलम ३ पहा.)

| वर्ष | क्रमांक | लघु संज्ञा | ज्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला ती मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | **मुंबई व महाराष्ट्र अधिनियम.** | |
| १८७९ | ५ | मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९. | कलम १, पोट-कलम (२) मधील "मुंबई शहर" या मजकुराऐवजी "मुंबई शहर खेरीज करून" हा मजकूर दाखल करण्यात यावा |
| १९५६ | ५८ | मुंबई म्युनिसिपल हद्दी आणखी वाढविण्याबाबत व अनुसूचि ब-ब-अ (सुधारणा) अधिनियम, १९५६. | कलम ३० मधील, "कलम ६" या मजकुराऐवजी "कलम ७" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| १९५८ | ३१ | मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९५७. | (१) विभाग २ च्या शीर्षकामधील "मुंबई" या शब्दाऐवजी "महाराष्ट्र" हा शब्द दाखल करण्यांत यावा.<br>(२) कलम ३ च्या समास टीपेतील "मुंबई" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र" हा मजकूर दाखल करण्यात यावा. |
| १९५८ | ९९ | मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ विभाग व कच्छ प्रदेश) अधिनियम, १९५८. | (१) दीर्घ संज्ञा व प्रास्ताविक यांतील "मुंबई राज्याच्या विदर्भ विभागातील व कच्छ प्रदेशांतील" या मजकुराऐवजी, "महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागातील" हा मजकूर दाखल करण्यात यावा.<br>(२) कलम १, पोट-कलम (१) मधील "व कच्छ विभाग" हा मजकूर वगळण्यात यावा. |

दुसरी अनुसूचि—चालू.

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | ज्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला ती मर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९५९ | ३ | मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८. | (१) कलम १२९ मधील पोट-कलम (८) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :— "(८) (अ) जर पंचायत, तिला येणे असलेला कोणताहि कर, फी किंवा कोणतीहि रक्कम वसूल करण्यात कसूर करील किंवा या कलमाची पोट-कलमे (२) व (४) अन्वये उपाययोजना करण्यात हयगय करील, किंवा, (ब) जर न्याय पंचायत कलम ११७, पोट-कलमे (२), (३) अन्वये उपाययोजना करण्यात कसूर किंवा हयगय करील तर पंचायत समितीस, उक्त रक्कम, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, वसूल करण्याबद्दल कलेक्टराकडे अर्ज करण्याचा अधिकार असेल. (२) कलम १३०, कंडिका (अ) मधील, 'पंचायतीने प्रमाणपत्र दिलेली व कलम १२९, पोट-कलम (८) अन्वये त्यास वसूल करता येईल' या मजकुराऐवजी 'कलम १२९, पोट-कलम (८) अन्वये पंचायत समितीने अर्ज केल्यावर त्यास वसूल करता येईल' हा मजकूर दाखल करण्यात यावा". |
| १९६१ | ४५ | हैदराबाद कुळवहिवाट व शेत-जमीन (पुन्हा अधिनियमित करणे, वैधकरण व आणखी सुधारणा याबाबत) अधिनियम, १९६१. | दुसऱ्या अनुसूचीतील, हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन (सुधारणा) अधिनियम, १९६० (सन १९६० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८) याच्या कलम १५ मधील कंडिका (अ) वगळण्यात यावी. |

दुसरी अनुसूचि—समाप्त.

| वर्ष. | क्रमांक. | लघु संज्ञा. | ज्या मर्यादेपर्यंत सुधारण्यात आला ती मर्यादा. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १९६२ | २७ | महाराष्ट्र शिक्षण (उपकर) अधिनियम, १९६२. | (१) कलम ९ मध्ये :—<br>(अ) पोट-कलम (१), कंडिका (अ) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :—<br>"(अ) छावण्यामध्ये, जिल्ह्याच्या कलेक्टरकडून; आणि";<br>(ब) पोट-कलम (२), कंडिका (अ) मधील, "पुणे, खडकी व कामठी" हा मजकूर वगळण्यात येईल.<br>(२) कलम १०, पोट-कलम (१) मधील "यथास्थिति पुण्याच्या किंवा नागपूरच्या" हा मजकूर वगळण्यात येईल. |

(True translation)

G. V. DIVEKAR,
Examiner of Books and Publications, Bombay.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.